# भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील आयात-निर्यातीच्या बदलांचे विश्लेषण

**डॉ. अमोल अरुण पगार**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव
ता.चाकूर जि.लातूर

**प्रस्तावना-**

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे आयात- निर्यातीचे व्यवहार वाढून देशाच्या औद्योगीकरणाला चालना मिळते. देशाची औद्योगिक प्रगती घडून येते. तसेच अर्थव्यवस्थेतील शेती व्यापार वाहतूक दळणवळण बँक व्यवसाय या सर्वच क्षेत्रांचा विकास घडून येतो. विकसनशील राष्ट्रांच्या दृष्टीने तर विदेशी व्यापार म्हणजे आर्थिक विकासाचा एक मार्गच असते. कारण जपान, इंग्लंड या देशांनी विदेशी व्यापाराचा मार्ग स्वीकारून आर्थिक विकासाची गती वाढवली तर अमेरिकेसारख्या प्रगत देशाने विदेश व्यापाराच्या माध्यमातून जगातील सर्व देशांवर आर्थिक वर्चस्व निर्माण केले आहे. एकंदरीतच विकसनशील विकसित अशा सर्व देशांसाठी विदेश हा पार खूप महत्वाचा असतो. भारतीय अर्थव्यवस्था विकसनशील असल्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराचे भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वाचे योगदान आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात उद्योगधंद्यांचे प्रमाण उत्पादनाचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रमाण खूपच कमी होते. जागतिक व्यापारातील भारताच्या हिस्सेदारीचा विचार करता 1950-51 मध्ये भारताचा जागतिक व्यापारातील हिस्सा 2.2% होता. 1990-91 मध्ये तो हिस्सा 0.7% पर्यंत कमी झाला. तर 2000-2001 मध्ये काहीसा आणखी कमी होऊन 0.6% झाला. यानंतर 2010-11 मध्ये हा वाटा 1.6% पर्यंत वाढला. 2020-21 मध्ये हा वाटा 1.8% पर्यंत वाढला. तर सद्यस्थितीत भारताचा जागतिक व्यापारातील हिस्सा 1.8% असून सन 2023 मध्ये भारताचा एकूण विदेश व्यापार 1 ट्रिलियनच्या पुढे गेला, ज्यात निर्यात सुमारे 422.23 अब्ज आणि आयात सुमारे 625.87 अब्ज होती. यामुळे भारताला 203 अब्जांची व्यापार तूट झाली. युनाइटेड स्टेट्स हा भारताचा सर्वात मोठा व्यापार भागीदार राहिला, ज्याचा एकूण व्यापार 100 अब्जच्या जवळ होता, तर चीन दुसऱ्या क्रमांकावर आहे. तर भारत वस्तू निर्यात करणाऱ्या देशांमध्ये 18व्या स्थानावर आहे. व्यावसायिक सेवा क्षेत्र निर्यातांमध्ये 7व्या आणि आयातांमध्ये 9व्या स्थानावर आहे. भारत लोकसंखेच्या दृष्टीने जगातील आघाडीचा देश असून आंतरराष्ट्रीय व्यापारातील त्याचे योगदान अत्यंत नगण्य आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आयात- निर्यातीमध्ये झालेल्या बदलांचे तसेच आंतरराष्ट्रीय व्यापार भारताच्या आर्थिक विकासात किती महत्वपूर्ण आहे याबाबींचे संशोधनात्मक अध्ययन करण्यात आले आहे.

**विषय विवेचन -**

स्वातंत्र्यपूर्वकाळात भारताची निर्यात नेहमी भारताच्या आयातीपेक्षा अधिक असायची त्यामुळे भारताचा व्यापारतोल नेहमी अनुकूल होता. परंतु ब्रिटिश सरकारने भारतीय अर्थव्यवस्थेची केलेली लूट आणि भारतावर लादलेल्या गुलामगिरीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे अतोनात नुकसान झाले. इंग्लंड, अमेरिका, जपान, जर्मनी यासारखे देश आंतरराष्ट्रीय व्यापारातून प्रगती साध्य करून खूप विकसित झाले आहेत परंतु अजूनही भारताच्या व्यापारतोलामध्ये सातत्याने तूट दिसत आहे.

**भारताच्या आयात निर्यातीच्या आकारमानातील बदलाचे अध्ययन-**

| अ.क्र | वर्ष | निर्यात मूल्य (कोटी रुपये) | आयात मूल्य (कोटी रुपये) | व्यापार तोल |
|---|---|---|---|---|
| 1 | 1950-51 | 606 | 608 | -2 |
| 2 | 1960-61 | 642 | 1122 | -480 |
| 3 | 1970-71 | 1535 | 1634 | -99 |
| 4 | 1972-73 | 1971 | 1867 | +104 |
| 5 | 1976-77 | 5142 | 5074 | +68 |
| 6 | 1980-81 | 6711 | 12549 | -5838 |
| 7 | 1990-91 | 32553 | 43198 | -10645 |
| 8 | 2000-01 | 201356 | 228307 | -26950 |
| 9 | 2010-11 | 1136964 | 1683467 | -546503 |
| 10 | 2020-21 | 2159043 | 2915958 | -756914 |
| 11 | 2023-24 | 3619292 | 5592877 | -1973585 |

उपरोक्त तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, स्वातंत्र्यानंतर भारताची आयात प्रचंड प्रमाणात वाढली आहे. निर्यातीतही प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. आयात आणि निर्यातीचा तुलनात्मक विचार केला असता आयातीतील वाढ अधिक आहे, त्यामुळे भारताचा व्यापारतोल नेहमी प्रतिकूल राहताना दिसत आहे.

सन 1950-51 मध्ये भारताची निर्यात 606 कोटी रुपये एवढी होती तर आयात 608 कोटी रुपये एवढी होती. आयात आणि निर्यातीची मूल्य हे जवळपास सारखे होते परंतु त्यानंतर 1960 च्या दशकात आयात मूल्यात अधिक वाढ झाल्याने 480 कोटी रुपयांची तूट निर्माण झाली. त्यानंतर 1972-73 व 1976-77 हे दोन आर्थिक वर्ष वगळता भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारतोलात सातत्याने तूट असल्याचे दिसते.

सन 1950-51 मध्ये 606 कोटी रुपये असलेले निर्यात मूल्य सन 2023-24 मध्ये 3619292 कोटी रुपये इतके झाले म्हणजे या 73 वर्षांच्या काळात भारताचे निर्यात मूल्य 3618686 कोटी रुपयांनी वाढले आहे हि वाढ साधरणता: 5973 पटीने झाल्याचे दिसते. तर आयात मूल्य 608 कोटी रुपयांवरून 5592877 कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे ही वाढ 5592269 कोटी रुपये इतकी प्रचंड आहे. तर निर्यात मुल्यातील वाढ साधरणता: 9198 पट इतकी प्रचंड आहे. निर्यात मुल्यातील वाढीपेक्ष्या आयातमुल्यातील वाढीचे अंतर 3225 पट इतके अधिक असून व्यापारतोलातील तुट मोठ्या प्रमाणत वाढली आहे.

भारताचे आयात मूल्य वाढण्याच्या कारणांचे विश्लेषण आपणास पुढील प्रमाणे करता येईल.

सुरुवातीला स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर भारतीय अर्थव्यवस्था नवीन उद्योगांच्या निर्मितीसाठी तसेच शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आणण्यासाठी धडपडत होती. तसेच भारतातील शेती उत्पादन ही कमी असल्यामुळे भारताला मोठ्या प्रमाणावर अन्नधान्याची आयात करावी लागली त्यामुळे स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतात अन्नधान्याची आयात मोठ्या प्रमाणावर झाली. 1990 च्या दशकांनंतर उदारीकरण धोरणाचा स्वीकार केल्यानंतर अनेक आवश्यक आणि अनावश्यक वस्तू मोठ्या प्रमाणात भारतात येऊ लागल्या त्यामुळेही भारतीय आयात मूल्यात वाढ झाली. जागतिकीकरणाच्या काळात भारतीय औद्योगिक उत्पादन आणि सेवा क्षेत्रात वाढ होऊ लागल्याने उच्च दर्जाच्या कच्च्या मालाची आणि यंत्रांची गरज भासू लागल्याने मोठ्या प्रमाणात यंत्रे, रासायनिक उत्पादने आणि इतर कच्च्या मालाची आयात वाढली. नीती आयोगाच्या अहवालानुसार भारतात शहरीकरण व पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या वाढीमुळे मोठ्या प्रमाणात आयात मूल्य वाढले आहे. भारतीय लोकांच्या जीवनशैलीत 1990 नंतर प्रचंड बदल झाले आणि त्याचा परिणाम म्हणून विदेशी वस्तूंची मागणी वाढली म्हणून आयात मूल्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. भारतात ऊर्जा उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या कच्च्या मालाची म्हणजेच जसे की तेल,गॅस आवश्यक असते भारत हा जगातील तिसरा मोठा तेल आयात करणारा देश आहे त्यामुळे 2022 मध्ये भारताने 124.5 बिलियन डॉलरचे तेल आयात केले. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढणारी भाववाढ, आखाती देशांमध्ये झालेले युद्ध यामुळे देखील भारतीय आयात मूल्यात वाढ झाली आहे. तसेच भारतीय निर्यात कमी होण्याची कारणे खालील प्रमाणे सांगता येतील. वांरवार येणारे जागतिक आर्थिक संकटांमुळे भारताच्या निर्यातदरांवर परिणाम होत असून मंदीमुळे आंतरराष्ट्रीय मागणी कमी होते,

ज्यामुळे निर्यात घटत आहे. भारतीय रुपयाचे मूल्य आंतरराष्ट्रीय बाजारात कमी झाले तर निर्यातदारांच्या नफ्यावर परिणाम होतो. त्याचबरोबर, जर इतर देशांच्या चलनांचे मूल्य वाढले तर भारतीय मालावर अधिक खर्च होतो, ज्यामुळे मागणी कमी होते. काही वेळा इतर देशांतील उत्पादने अधिक स्वस्त आणि उच्च गुणवत्तेची असल्यामुळे भारतीय उत्पादनांच्या निर्यातीवर परिणाम होतो. तसेच, अनेक भारतीय उद्योगांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्च दर्जाच्या वस्तू पुरवतील अशा तंत्रज्ञानाचा अभाव आहे त्यामुळे चीन सारख्या देशांशी स्पर्धा टिकवणे कठीण होत असल्याने निर्यात कमी होत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या मालाच्या किमतीत वाढ झाल्यास उत्पादन खर्च वाढतो, ज्यामुळे निर्यातीत तूट येत आहे.

**निष्कर्ष-**

1. आंतरराष्ट्रीय व्यापार हा देशाच्या आर्थिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताच्या औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत आंतरराष्ट्रीय व्यापाराने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.
2. स्वातंत्र्यानंतर भारताची निर्यात प्रारंभिक काळात आयातीपेक्षा जास्त होती, परंतु कालांतराने व्यापार तूट वाढली आहे. 1950-51 मध्ये आयात आणि निर्यातीतील जवळजवळ समतोल होता, परंतु 2023-24 पर्यंत भारताची आयात खूपच वाढली असून निर्यात तुलनेने कमी राहिली आहे, ज्यामुळे व्यापार तूट प्रचंड प्रमाणात वाढली आहे.
3. स्वातंत्र्याच्या 73 वर्षांच्या काळात निर्यात मूल्य 5973 पट वाढले असले तरी आयात मूल्य 9198 पट वाढले आहे. यामुळे स्पष्ट होते की आयात आणि निर्यात यामध्ये असंतुलन निर्माण झाले आहे.
4. जागतिक आर्थिक संकट, भारतीय रुपयाचे मूल्य, आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या मालाचे मूल्य, आणि इतर देशांच्या उत्पादनांची गुणवत्ता ही सर्व कारणे भारतीय निर्यातावर प्रभाव टाकत आहेत.
5. भारतीय उद्योगांमध्ये उच्च दर्जाचे तंत्रज्ञान व उत्पादने उपलब्ध नसल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा टिकवणे कठीण जात आहे. विशेषत:, चीन सारख्या देशांशी स्पर्धा करण्यास भारतीय उत्पादने कमी सक्षम आहेत.
6. 1990 च्या दशकातील उदारीकरण धोरणामुळे भारताच्या आयातीत प्रचंड वाढ झाली आहे, जे भारताच्या अर्थव्यवस्थेच्या विकासास कारणीभूत ठरले आहे. पण यामुळे आयात मूल्य अधिक वाढले आहे.
7. भारताच्या आर्थिक विकासासाठी आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ करणे आवश्यक असून, आयात कमी करून निर्यात वाढीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भ -**


1. https://en.wikipedia.org/wiki/Foreign_trade_of_India
2. https://www.rbi.org.in/scripts/PublicationsView.aspx?id=20594
3. https://wits.worldbank.org/CountrySnapshot/en/WLD
4. ***Economic survey of India 2023-24***, Government of India, Ministry of Finance Department of economic affairs economic division, New Delhi.
5. देसले किरण, (2015), ‘***स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र भाग-1***’, दीपस्तंभ प्रकाशन,जळगाव, पाचवी आवृत्ती.
6. चव्हाण एन. एल.,(2009), ‘***भारतीय अर्थव्यवस्था***’, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथम आवृत्ती.
7. प्रा.रायखेलकर / डॉ.दामाजी, (2013) ‘,***भारतीय अर्थव्यवस्था***’, विद्या बुक्स पब्लीशेर्स, औरंगाबाद, सुधारित आवृत्ती.
8. पगार एस.के आणि देशमुख एस.जे.(2015), ***आंतरराष्ट्री अर्थशास्त्र***, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथम आवृत्ती.